रे.दि.मु.नं.११८/२०१३
नि.१०७ लगत

**उलटतपास वादी तर्फे विधीज्ञ श्री.आर.आर. यादव यांचे मार्फत सुरु.**

२१. प्रतिवादी क्र.१ माझे वडील आहेत हे म्हणणे खरे आहे. आज ते न्यायालयात हजर आहेत. वाद मिळकतीचा जुना सर्व्हे नंबर ३७४/६ आहे. वाद मिळकतीचा मी मालक नाही हे म्हणणे खरे आहे. सन २०१३ पासून मी या दाव्याचे काम पाहतो हे म्हणणे खरे आहे. या दाव्यातील निशाणी ५ वरील ताकीद अर्जावर झालेल्या अपीलात या न्यायालयातील निकाल रद्द करण्यात आला हे म्हणणे खरे आहे. सदर निर्णयाचे विरोधात मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल केलेली रिट फेटाळण्यात आली हे म्हणणे खरे आहे. सदरच्या आदेशात मला व माझ्या वडीलांना वादींना हरकत अडथळा करुन त्रास देवू नये असे नमूद आहे हे म्हणणे खरे आहे. असे असताना सुध्दा मी वादींना हरकत अडथळा करतो हे म्हणणे खरे नाही. उभ्या पिकावर ॲसीड टाकणे व उभे पिक जाळून टाकणे असे कृत्य केले हे म्हणणे खरे नाही.

उलटतपास वादीचे वकीलांचे विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकूब.

**समक्ष/ श्रवणोत्तर स्वीकृत**

SMRUTI SAGAR PALSULE

Digitally signed by SMRUTI SAGAR PALSULE
Date: 2024.12.17 16:52:20 +0530

**(एस.एस.पळसुले)**

**दिनांक :- १७.१२.२०२४** **तिसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर,वाई**